| दिनांक 28/04/2025 |
|---|
| **1.** दिघी (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/04/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे तुरूंबाडी येथील दास ऑफ शोअर कंपणीमध्ये ता. म्हसळा येथे फिर्यादी रा दास ऑफ शोअर कंपणी रोहीणी यार्ड ता. म्हसळा हे दिनांक 26/04/2025 रोजी 21.30 वाजता ते 23.00 वाजताचे सुमारास ते काम करीत असलेल्या दास कंपणीतील कॅन्टीन मधील किचनमध्ये स्वयंपाक बनवित असतांना झालेल्या वादावरून आरोपित क्र. 01 व 02 रा दास ऑफ शोअर कंपणी रोहीणी यार्ड ता. म्हसळा यांनी आपसात संगणमत करून फिर्यादी हे त्यांचे रूममध्ये जात असतांना फिर्यादी यांना शिवीगाळी करून आरोपित क्र. 01 हा फिर्यादी यांचे पाठीमागुन येवुन हातात दगड घेवुन फिर्यादी यांचे डोक्यात दगड मारून फिर्यादी यांना जखमी केले.<br>याबाबत दिघी (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.26/2025, भारतीय न्याय संहीता 118(1), 115(2),352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री. अर्शद शेख हे करीत आहेत. |
| **2.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/04/2025 रोजी 22:30 वा च्या सुमारास मौजे टाकपाडा आळी रावे, ता.पेण येथे फिर्यादी रा.टाकपाडा आळी, रावे, पेण हे त्यांचे गावातील म्हसोबा देवाचे जागरण सोहळा चालु असताना आपसात धक्काबुक्की झाली. धक्काबुक्की सोडविण्याकरीता फिर्यादी यांचे सोबत असणारे साक्षीदार क्र 01 व 02 हे वाद मिटविण्याकरीता गेले असताना अचानक साक्षीदार क्र 02 हे खाली पडल्याने फिर्यादी हे साक्षीदार क्र 02 यास उचलण्याकरीता गेले असता आरोपीत क्र.01 याने बाजुला पडलेला दगड उचलुन फिर्यादी यांचे डोक्यात मारला तेव्हा फिर्यादी यांचे बाजुला असलेला फिर्यादी यांचे काका यांना आरोपीत क्र.02 याने बांबुची उपट मारली त्यावेळी तेथे असलेला फिर्यादी यांचा चुलत भाउ यांस आरोपीत क्र.03 याने बांबुची उपट मारली त्यामुळे फिर्यादी व फिर्यादीचा चुलत काका व भाउ यांचे डोक्यास दुखापत झाली.<br>याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं. 22/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/ पवार ह्या करीत आहेत. |
| **3.** दिघी (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/04/2025 रोजी 21:30 वा ते दि. 27/04/2025 रोजी 21:30 वा च्या दरम्यान मौजे तुरूंबाडी येथील दास ऑफ शोअर कंपणीमध्ये |

ता. म्हसळा येथे फिर्यादी रा. दास ऑफ शोअर कंपणी रोहीणी यार्ड ता. म्हसळा हे कॅन्टीन मध्ये जेवणासाठी गेले असता आरोपीत रा. दास ऑफ शोअर कंपणी रोहीणी यार्ड ता. म्हसळा यांनी दारू पिवुन तेथे येवुन फिर्यादी यास शिवीगाळी केली तसेच फिर्यादी हे त्यांचे रूममध्ये विश्रांती करीत असतांना आरोपीत यांनी दारूचे नशेत फिर्यादी यांस विनाकारण शिवीगाळी करू लागल्याने त्यास फिर्यादी यांनी विरोध केला असता त्या गोष्टीचा मनात राग धरून आरोपीत यांनी त्याचे हातातील लाकडी दांडक्याने फिर्यादी यांचे डोक्यात मारून फिर्यादी यांना जखमी केले.

याबाबत दिधी (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.27/2025, बी एन एस कायदा चे कलम 118(1), 115(2), 352,351(2), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई अर्शद शेख हे करीत आहेत.

**4.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/04/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे कोस्ते सी.एन.जी.पंप जवळ निजामपुर -माणगांव रोडवर ता. माणगांव येथे फिर्यादी रा. पाणोसे ता. माणगांव हे त्याचे .शाईन मोटार सायकल नं एम.एच 06 बी.व्हाय 1065 यावर त्याचा मित्र यांस पाठीमागे बसवुन सदर मोटारसायकल स्वत: चालवित निजामपुर ते पाणोसे अशी निजामपुर ते माणगांव रोडने जात असताना ,माणगांव बाजुकडुन निजामपुर बाजुकडे जाणारी व्हॅगनर कार एम.एच 12 यु.जे 3404 वरिल आरोपीत चालक रा. .फ्लॅट नं 303, राजगड व्हिला सोसा,सिंहगड-2,आंबेगाव पठार, पुणे याने त्याचे ताब्यातील कार अतिवेगाने, हयगयीने, बेदकारपणे ,रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन सदर कार ही रॉंग साईडला नेवुन फिर्यादी यांचे मोटार सायकलला ठोकर मारुन अपघात केला. सदर अपघातात फिर्यादी व त्यांचा मित्र यांचे लहान मोठया स्वरुपाच्या दुखापतीस व दोन्ही वाहनाच्या नुकसानिस कारणीभुत झाला.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं. 84/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता कलम 125a,125b,281 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/किरण तुणतुणे हे करीत आहेत.

**5.** पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/04/2025 रोजी 17:30 वा च्या सुमारास मौजे मठ्ठगली पोलादपुर येथील क्रिकेट मैदानात ता.पोलादपूर येथे फिर्यादी रा. मठ्ठगली पोलादपुर ता.पोलादपुर हे क्रिक्रेट खेळत असताना आरोपीत रा.मठगली पोलादपुर ता पोलादपुर याने बॉलींग केली असता तेव्हा साक्षीदार नं.1 याने तो बॉल नो बॉल दिल्याने आरोपीत यास त्या गोष्टीचा राग आल्याने त्याने साक्षीदार नंबर 1 यास हुज्जत घालुन धक्काबुक्की केल्याने फिर्यादी व साक्षीदार नंबर 2,3,4 हे सोडविण्याकरीता गेले असता आरोपीत याने फिर्यादी यास दगड फेकुन मारुन फिर्यादी याचे डोक्यात दुखापती केल्या.

याबाबत पोलादपूर पोलीस ठाणे गुरनं.22/2025 भा.दं.वि.क. 118 , 118(1),115 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/राज पवार हे करीत आहेत.

**6.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/04/2025 रोजी 12:30 वा च्या सुमारास फिर्यादी

यांचे राहते घरातुन. ता .खालापुर येथे फिर्यादी यांची मुलगी ही मैत्रीणीकडे जाते असे सांगून घरातुन निघुन गेली ती अदयाप पर्यत घरी आली नसल्याने फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांचेकडे शोध घेतला असता ती मिळुन न आल्याने फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांची खात्री झाली आहे की, फिर्यादी यांची मुलगी ही लहान असल्याचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरीता फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.132/2025, भा.न्या.सं.क.2023 चे कलम 137 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/अमित सावंत हे करीत आहेत.

**7.** महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/04/2025 रोजी 16:45 वा च्या सुमारास मौजे महाड रायगड रोडवर तळोशी फाटा येथे फिर्यादी रा. तळोशी ता. महाड, ता महाड बाजूकडून त्यांची मोटारसायकल हिरो होंडा स्प्लेडंर एम.एच.01 ई.ए.7226 ही स्वत: चालवित महाड रायगड रोडने तळोशी गावात जात असताना मौजे तळोशी फाटा येथे आलेवेळी रायगड बाजूकडून येणारी टी.व्ही.एस एन टी ओ आर क्यू क्रं एम.एच.06सी.एच.2762 यावरील आरोपित चालक रा कोंडीवते, नविन वसाहत ता.महाड हा त्याचे ताब्यातील मोटारसायकल ही हयगईने , अतिवेगात निष्काळजीपणाने रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन हिरो होंडा स्प्लेडंर एम.एच.01 ई.ए.7226 हीस समोरून जोरात ठोकर मारून अपघात करून फिर्यादी व साक्षीदार तसेच स्वत:स गंभीर व किरकोळ दुखापत करून दोन्ही गाडीचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे गुरनं. 17/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, बी.एन.एस 2023 चे कलम 281,125 a ,125 b प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/रवी धोत्रे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 27.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 233 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,04,900/-रुपये इतका दंड आकारला आहे.